# BOMBAY ACT No. II OF 1956.

## AN ACT TO PROVIDE FOR THE EVICTION OF CERTAIN PERSONS FROM GOVERNMENT PREMISES AND FOR CERTAIN MATTERS CONNECTED THEREWITH.

# सन १९५६ चा मुंबईचा अधिनियम २ रा.

[ राष्ट्रपति यांची मंजुरी मिळाल्यानंतर " मुंबई राजपत्रांत " तारीख १९ माहे जानेवारी सन १९५६ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

## सरकारी जागांतून विवक्षित इसमांना काढून लावण्याची व त्यांशीं संबंध असलेल्या विवक्षित बाबींची तजवीज करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, सरकारी जागांतून विवक्षित इसमांना काढून लावण्याची व त्यांशीं संबंध असलेल्या विवक्षित बाबींची तजवीज करणें इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी यावरून पुढें लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे :—

१. हचा अधिनियमास सन १९५५ चा मुंबईचा सरकारी जागांतून काढून लावण्याबाबत अधिनियम असें म्हणावें. लहान सरनामा.

२. हचा अधिनियमांत, संदर्भावरून इतर रीतीनें आवश्यक असेल तें खेरीजकरून,— व्याख्या.

(अ) "लायक प्राधिकारी" हचा संज्ञेचा अर्थ, कलम ३ अन्वयें लायक प्राधिकारी म्हणून नेमलेला अधिकारी असा समजावा;

(ब) "सरकारी जागा" हचा संज्ञेचा अर्थ मुंबई सरकारच्या मालकीची किंवा त्यानें पट्टचानें दिलेली किंवा मागणी केलेली कोणतीहि जागा असा समजावा;

(क) "जमीन" या संज्ञेत जमिनीतून उत्पन्न होणाऱ्या फायद्यांचा व भूमीस जोडलेल्या किंवा भूमीस कायम बांधलेल्या किंवा भूमीस जोडलेल्या कोणत्याहि वस्तूस कायम बांधलेल्या वस्तूंचा समावेश होतो;

(ड) "जागा" हचा संज्ञेचा अर्थ, कोणतीहि जमीन किंवा इमारत किंवा इमारतीचा भाग, असा समजावा; आणि तींत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(१) अशा इमारतीस किंवा इमारतीच्या भागास लागून असलेली बाग, खुली जागा व औट-हाउसिस, कोणतीहि असल्यास, तीं आणि

(२) अशा इमारतीचा किंवा इमारतीच्या भागाचा अधिक फायदेशीर रीतीनें उपभोग घेतां यावा म्हणून अशा इमारतीस किंवा इमारतीच्या भागास जोडलेलीं कोणतीहि फिटिंग्ज्;

(इ) "ठरविलेलें" ह्या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमाअन्वयें केलेल्या नियमांवरून ठरविलेलें, असा समजावा.

लायक प्राधिकाऱ्यांची नेमणूक.

३. राज्य सरकारास, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, त्याच्या मतें जो अधिकारी डेप्युटी कलेक्टरच्या किंवा एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाहीं असा हुद्दा धारण करीत असेल किंवा ज्यानें असा हुद्दा धारण केला होता त्यास, अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा प्रदेशांत, ह्या अधिनियमाचे हेतु पार पाडण्यासाठीं, लायक प्राधिकारी म्हणून नेमण्याचा अधिकार आहे.

काढून लावण्याचा अधिकार.

४. (१) जर लायक प्राधिकाऱ्याची अशी खात्री होईल कीं,—

(अ) कोणत्याहि सरकारी जागेचा भोगवटा करण्याचा अधिकार दिलेल्या इसमानें, ह्या अधिनियमाच्या सुरुवातीपूर्वी किंवा नंतर,—

(१) अशा जागेच्या संबंधांत त्याजकडून कायदेशीर रीतीनें येणें असलेलें दोन महिन्यांपेक्षां अधिक मुदतीचें भाडें दिलेलें नाहीं, किंवा

(२) राज्य सरकारच्या किंवा लायक प्राधिकाऱ्याच्या परवानगी-वांचून अशी सबंध जागा किंवा तिचा कोणताहि भाग पोट-भाड्यानें दिलेला आहे, किंवा

(३) ज्या स्पष्ट किंवा गर्भित शर्तीनुसार त्यास अशा जागेचा भोगवटा करण्याचा अधिकार दिलेला असेल अशा कोणत्याहि शर्तीचें उल्लंघन होईल अशा रीतीनें कोणतेंहि कृत्य केलें आहे, किंवा

(ब) कोणतीहि सरकारी जागा कोणत्याहि इसमाच्या अनधिकृत भोगवट्यांत आहे, किंवा

(क) नामनिर्दिष्ट केलेली कोणतीहि सरकारी जागा इतर कोणत्याहि सरकारी कारणांसाठीं पाहिजे आहे,

तर, लायक प्राधिकाऱ्यास, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यांत कोणताहि मजकूर असला तथापि, (१) पोष्टानें, किंवा (२) अशा जागेच्या बाहेरील दरवाजावर किंवा सहज दिसेल अशा इतर कोणत्याहि भागावर नोटिशीची एक प्रत चिकटवून, किंवा (३) ठरविण्यांत येईल अशा इतर रीतीनें, नोटीस बजावून, असा हुकूम करण्याचा अधिकार आहे कीं, त्या इसमानें त्याचप्रमाणें ज्याच्या भोगवट्यांत ती सबंध जागा किंवा तिचा कोणताहि भाग असेल अशा इतर कोणत्याहि इसमानें, नोटीस बजाविल्याच्या तारखे-पासून एका महिन्याच्या आंत ती जागा खाली केली पाहिजे.

(२) कोणत्याहि इसमाविरुद्ध पोट-कलम (१) अन्वयें हुकूम करण्यांत येण्यापूर्वी लायक प्राधिकाऱ्यानें सदरहू इसमास लेखी नोटीस देऊन, योजिलेला हुकूम ज्या कारणांसाठीं करावयाचा असेल तीं कारणें कळविलीं पाहिजेत आणि अशा नोटिशींत निर्दिष्ट करावयाच्या मुदतींत त्यांसंबंधींचा खुलासा सादर करण्याची आणि पुरावा, कोणताहि असल्यास, हजर करण्याची आणि असा हुकूम कां करण्यांत येऊं नये याचें कारण दर्शविण्याची वाजवी संधि त्यास दिली पाहिजे. जर असा इसम, नोटिशींत निर्दिष्ट केलेली मुदत वाढविण्यासाठीं लायक प्राधिकाऱ्याकडे अर्ज करील तर लायक प्राधिकाऱ्यास, नोटिशींत मागितलेली रक्कम देण्याविषयीं व वसूल करण्याविषयीं त्यास योग्य वाटतील अशा अटींवर त्या अर्जास मंजुरी देण्याचा अधिकार असेल. अशा इसमानें दिलेली कोणतीहि लेखी जबानी आणि अशा नोटिशीच्या अनुरोधानें हजर केलेले दस्तऐवज प्रकरणाच्या दप्तराबरोबर फाईल केले पाहिजेत आणि, ह्यासंबंधींचें काम चालविणाऱ्या अधिकाऱ्यापुढें वकिलामार्फत, मुखत्यारामार्फत किंवा प्लीडरामार्फत हजर राहण्याचा अशा इसमास हक्क असेल. अशी लेखी नोटीस, पोट-कलम (१) अन्वयें नोटीस बजावण्यासाठीं तरतूद केलेल्या रीतीनें बजावली पाहिजे.

(३) जर कोणताहि इसम पोट-कलम (१) अन्वयें केलेला हुकूम पाळण्याचें नाकारील किंवा पाळण्यांत कसूर करील, तर लायक प्राधिकाऱ्यास, त्या इसमास त्या जागेंतून काढून लावण्याचा व ती कबजांत घेण्याचा अधिकार आहे आणि त्या कारणासाठीं आवश्यक तेवढ्या जबरदस्तीचा उपयोग करण्याचा त्यास अधिकार आहे.

(४) राज्य सरकारास, पोट-कलम (३) अन्वयें ज्या इसमाकडून सरकारी जागेचा कबजा घेण्यांत आला असेल त्या इसमास पूर्ण चौदा दिवसांची नोटीस दिल्यानंतर आणि अशी नोटीस राजपत्रांत आणि सदरहू विभागांत प्रसार असलेल्या निदान एका वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केल्यावर, अशा जागेंत असलेली कोणतीहि मालमिळकत काढण्याचा किंवा काढविण्याचा किंवा जाहीर लिलांवानें तिची विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे. अशी नोटीस, पोट-कलम (१) अन्वयें नोटीस बजावण्यासाठीं ठरविलेल्या रीतीनें बजाविली पाहिजे.

(५) जेव्हां पोट-कलम (४) अन्वयें मिळकत विकण्यांत आली असेल तेव्हां ती विकून आलेली रक्कम, विक्रीचा खर्च वजा करून, ती मिळण्याचा हक्क असल्याचें राज्य सरकारास वाटत असलेल्या इसमास किंवा इसमांस दिली पाहिजे.

(६) पोट-कलम (१), रकम (अ), पोट-रकम (१) किंवा (३) हींत निर्दिष्ट केलेल्या कारणांसाठीं कोणतीहि सरकारी जागा, नोटीस बजाविल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत किंवा लायक प्राधिकारी परवानगी देईल अशा अधिक मुदतीच्या आंत खाली करण्याचा हुकूम देण्यांत आलेला इसम जर प्रसंगाप्रमाणें, सदरहू लायक प्राधिकाऱ्यास भाड्याची थकबाकी देईल किंवा सदरहू लायक प्राधिकाऱ्याची खात्री होईल अशा रीतीनें, त्यानें उल्लंघन

केलेल्या शर्ती पार पाडील किंवा इतर रीतीनें पाळील तर सदरहू लायक प्राधिकाऱ्यानें, पोट-कलम (३) अन्वयें असा इसम काढून लावण्याऐवजीं पोट-कलम (१) अन्वयें त्यानें केलेला हुकूम रद्द केला पाहिजे आणि त्यानंतर असा इसम, त्याजवर नोटीस बजावल्याच्या लगतपूर्वी ज्या शर्तींवर ती जागा त्यानें धारण केली होती त्याच शर्तींवर ती जागा धारण करील.

खुलासा.—हें कलम व कलम ५ यांच्या कारणांसाठीं, सरकारी जागेचा भोगवटा करण्याचा अधिकार असलेल्या कोणत्याहि इसमाच्या संबंधांत, "अनधिकृत भोगवटा" या संज्ञेंत, ज्या अधिकाराअन्वयें त्यास जागेचा भोगवटा करण्याची परवानगी देण्यांत आली होती तो अधिकार योग्य रीतीनें निश्चित करण्यांत आल्यानंतर त्यानें किंवा त्याच्यामार्फत किंवा त्याच्या वतीनें दावा सांगणाऱ्या कोणत्याहि इसमानें जागेचा भोगवटा करण्याचें चालू ठेवण्याचा समावेश होतो.

भाडें किंवा नुकसान-भरपाईची रक्कम जमीन-महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याचा अधिकार.

५. (१) राज्य सरकारनें ह्याबाबत केलेल्या कोणत्याहि नियमांस पात्र राहून व कलम ४ च्या ठरावांस बाध येऊं न देतां, जेव्हां कोणत्याहि सरकारी जागेच्या संबंधांत द्यावयाचें भाडें कोणत्याहि इसमानें थकविलें असेल तेव्हां, लायक प्राधिकाऱ्यास, (१) पोष्टानें, किंवा (२) नोटिशीची एक प्रत अशा जागेच्या बाहेरील दरवाजावर किंवा सहज दिसेल अशा इतर कोणत्याहि ठळक भागावर लावून, किंवा (३) ठरविण्यांत येईल अशा इतर रीतीनें, त्याजवर नोटीस बजावून, नोटिशींत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा दहा दिवसांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतींत ती थकबाकी देण्याविषयीं त्या इसमास हुकूम करण्याचा अधिकार आहे. जर असा इसम नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या मुदतींत अशी भाड्याची थकबाकी देण्याचें नाकारील किंवा देण्यांत कसूर करील, तर अशी थकबाकी जमीनमहसुलाच्या थकबाकीप्रमाणें वसूल करण्याचा अधिकार आहे.

(२) जेव्हां कोणताहि इसम कोणत्याहि सरकारी जागेचा अनधिकृतपणें भोगवटा करीत असेल तेव्हां लायक प्राधिकाऱ्यास, ठरविलेल्या रीतीनें, जागेच्या उपयोगाबद्दल किंवा भोगवट्याबद्दल त्यास योग्य वाटेल अशा नुकसानभरपाईची आकारणी करण्याचा अधिकार आहे आणि अशा इसमावर (१) पोष्टानें, किंवा (२) नोटिशीची एक प्रत अशा जागेच्या बाहेरील दरवाजावर किंवा सहज दिसेल अशा इतर ठळक भागावर लावून, किंवा (३) ठरविण्यांत येईल अशा इतर रीतीनें, नोटीस बजावून, नोटिशींत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा मुदतींत नुकसानभरपाईची रक्कम भरण्याविषयीं त्या इसमास हुकूम करण्याचा अधिकार आहे. जर असा इसम नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या मुदतींत नुकसानभरपाईची रक्कम भरण्याचें नाकारील किंवा तसें करण्यांत कसूर करील तर, सदरहू नुकसानभरपाईची रक्कम जमीनमहसुलाच्या थकबाकीप्रमाणें वसूल करण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलम (२) अन्वयेंचा कोणताहि हुकूम, सदरहू इसमास लेखी नोटीस देऊन, असा हुकूम कां करूं नये याविषयींचें कारण अशा नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या वाजवी मुदतींत दर्शविण्यास त्यास फर्माविण्यांत येईपर्यंत

आणि त्याच्या हरकती, कोणत्याहि असल्यास, त्या आणि त्याच्या पुष्टयर्थ तो हजर करील असा कोणताहि पुरावा लायक प्राधिकारी विचारांत घेईपर्यंत करण्यांत येतां कामा नये.

**सरकारी नोकरांच्या बाबतींत पगारांतून किंवा वेतनांतून पैसे कापून घेऊन भाडें वसूल करणें.**

६. कलम ४ च्या ठरावांस बाध न येतां, जो इसम राज्य सरकारचा नोकर आहे आणि ज्यास कोणतीहि सरकारी जागा देण्यांत आली आहे, त्या इसमाच्या बाबतींत, अशा जागेच्या संबंधांत त्याच्याकडून येणें असलेली भाड्याची रक्कम ही, असा इसम ज्या सरकारी खात्याच्या किंवा कचेरीच्या प्रमुखाच्या हाताखालीं नोकरी करीत असेल अशा प्रमुखाकडे लायक प्राधिकाऱ्यानें त्याबाबत लेखी मागणी केली असतां, अशा इसमास द्यावयाच्या पगारांतून किंवा वेतनांतून कापून घेतली जाण्यास पात्र असेल. असें मागणीपत्रक मिळाल्यावर, प्रसंगाप्रमाणें, अशा सरकारी खात्याच्या किंवा कचेरीच्या प्रमुखानें, मागणीपत्रकांत निर्दिष्ट केलेली रक्कम, अशा इसमास द्यावयाच्या पगारांतून किंवा वेतनांतून कापून घेतली पाहिजे आणि अशा रीतीनें कापून घेतलेली रक्कम, त्याजकडून येणें असलेल्या भाड्याच्या वसुलीसाठीं लायक प्राधिकाऱ्याकडे दिली पाहिजे.

**अपील.**

७. (१) कलम ४ किंवा कलम ५ अन्वयें लायक प्राधिकाऱ्यानें केलेल्या हुकुमामुळें नुकसानी पोहोंचलेल्या कोणत्याहि इसमास, प्रसंगाप्रमाणें, कलम ४ किंवा कलम ५ अन्वयें नोटीस बजाविल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आंत राज्य सरकारकडे अपील करण्याचा अधिकार आहे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अपील करणारास पुरेशा कारणामुळें योग्य वेळेच्या आंत अपील दाखल करतां आलें नाहीं अशी राज्य सरकारची खात्री होईल तर, सदरहू एक महिन्याची मुदत संपल्यानंतर सदरहू अपील दाखल करून घेण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें अपील पोहोंचल्यावर राज्य सरकारास, लायक प्राधिकाऱ्याकडून रिपोर्ट मागवून व आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीहि चौकशी केल्यानंतर त्यास योग्य वाटतील असे हुकूम करण्याचा अधिकार आहे आणि राज्य सरकारचे हुकूम अखेरचे असतील.

(३) पोट-कलम (१) अन्वयें अपील करण्यांत आलें असेल तेव्हां, राज्य सरकारास, त्यास योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत व अशा शर्तींवर लायक प्राधिकाऱ्याच्या हुकुमाची अंमलबजावणी स्थगित करण्याचा अधिकार आहे.

**दिवाणी न्यायालयांच्या हुकुमतीस मनाई.**

८. ह्या अधिनियमावरून किंवा त्याअन्वयें मिळालेले कोणतेहि अधिकार चालवून राज्य सरकारनें किंवा लायक प्राधिकाऱ्यानें केलेल्या कोणत्याहि हुकुमास कोणत्याहि न्यायालयांत हरकत घेतां कामा नये आणि या अधिनियमावरून किंवा त्याअन्वयें मिळालेल्या कोणत्याहि अधिकारास अनुसरून केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याहि उपाययोजनेच्या संबंधांत कोणत्याहि न्यायालयानें किंवा इतर प्राधिकाऱ्यानें कोणताहि मनाई हुकूम करतां कामा नये.

शुद्धबुद्धीनें केलेल्या कृत्याचें संरक्षण.

९. हा अधिनियम किंवा त्याअन्वयें केलेले कोणतेहि नियम किंवा हुकूम यांस अनुसरून शुद्धबुद्धीनें केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याहि कृत्याच्या संबंधांत राज्य सरकारविरुद्ध किंवा लायक प्राधिकाऱ्याविरुद्ध कोणताहि दावा, खटला किंवा इतर कायदेशीर इलाज करतां येणार नाहीं.

अधिकार सोंपविण्याबाबत.

१०. राज्य सरकारास, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, असें फर्माविण्याचा अधिकार आहे कीं, ह्या अधिनियमाअन्वयें त्यानें चालविण्याजोगा कोणताहि अधिकार, सदरहू अधिसूचनेंत निर्दिष्ट करण्यांत येतील अशा कोणत्याहि शर्तीस पात्र राहून, राज्य सरकारनें ह्याबाबत खास अधिकार दिलेल्या कोणत्याहि अधिकाऱ्यानेंदेखील चालविण्याजोगा असेल.

शिक्षा.

११. जो कोणताहि इसम, ह्या अधिनियमावरून किंवा त्याअन्वयें मिळालेला कोणताहि अधिकार कायदेशीर रीतीनें चालवीत असतांना प्रतिबंध करील त्यास, त्याजवर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाला असतां, पराकाष्टा एक हजार रुपये दंडाची शिक्षा होईल.

नियम.

१२. (१) राज्य सरकारास, राजपत्रांत अधिसूचना प्रसिद्ध करून, ह्या अधिनियमाचे हेतु पार पाडण्याकरितां नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून आणि सदरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां, अशा नियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याहि गोष्टींची तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(अ) नोटिशींचे नमुने आणि ज्या इतर रीतीनें त्या नोटिशी बजावतां येतील ती इतर रीत;

(ब) सरकारी जागा ताब्यांत घेण्यासाठीं अनुसरावयाची कार्यरीत;

(क) अनधिकृत भोगवट्याबद्दल नुकसानभरपाईची रक्कम ज्या रीतीनें आकारतां येईल ती रीत;

(ड) ज्या रीतीनें अपिलें करतां येतील ती रीत व अपिलांत अनुसरावयाची कार्यरीत;

(ई) ठरविण्यांत आली पाहिजे किंवा ठरविण्यांत येईल अशी इतर कोणतीहि बाब.

(True translation)

J. H. DAVE,

Examiner of Books and Publications, Bombay.